44

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/अभिकर्ता नेमणूक / लेखा वि/ कक्ष १५/२०१६/ ७७५६ दिनांक १७/१२/२०१६

विषय:- राज्य सहकारी संस्थांच्या निवडणूकीच्या संदर्भात वर्तमानपत्रांतील जाहिरातीवर होणा-या खर्चावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने निश्चीत केलेल्या दराप्रमाणे मान्यताप्राप्त वर्तमानपत्रामध्ये जाहिरातीद्वारे व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी जिल्हा स्तरावर अभिकर्त्याची नेमणूक करणे.

संदर्भ -- १. रासनिप्रा/अभिकर्ता नेमणूक/लेखा वि /कक्ष — १५ सन २०१६/५९६२ दि. १४.१०.२०१६

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी मतदार यादी तयार करण्याचे, अधिक्षण, संचलन व नियंत्रण तसेच निवडणूकीसाठी निधी निश्चीत करणे व तो सहकारी संस्थांकडून प्राप्त करुन घेवून निवडणूकीचे आयोजन करुन समिती निवडणूक घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे सोपविण्यात आली आहे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिका-याने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील तरतूदीनुसार निवडणूक घेणेबाबत कामकाज करताना निवडणूक नियमातील तरतुदीनुसार "अ" व "ब" संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमास नियम ६,७,८,९,१०,११,१८ व १९(४) मधील तरतूदीनुसार वर्तमानपत्राद्वारे जाहिर व व्यापक प्रसिध्दी देणे बंधनकारक आहे. सर्वसाधारणपणे सहकारी संस्थेच्या निवडणूकी संदर्भात खालील बाबींसाठी दैनिक वर्तमानपत्राद्वारे व्यापक प्रसिध्दी दिली जाते.

१) सहकारी संस्थांच्या मतदार यादी कार्यक्रमाची जाहिरात प्रसिध्द करणे.

२) सहकारी संस्थांच्या निवडणूक कार्यक्रमाची जाहिरात प्रसिध्द करणे.

३) मतदान केंद्राच्या ठिकाणांची माहिती प्रसिध्द करणे.

४) निवडणूकीसाठी आवश्यक असलेल्या बाबींवर निविदा मागवून खरेदी करणे / भाडेपट्याने / तत्वावर घेणे इ. बाबींसाठी जाहिरात देणे.

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकी संदर्भातील आवश्यक त्या जाहिराती शासन मान्यताप्राप्त दैनिक वर्तमान पत्रामध्ये शासन दराप्रमाणे प्रसिध्द न करता व्यापारी दराने प्रसिध्द केल्यामुळे निवडणूक निधीतून जादा खर्च होत असल्याचे प्राधिकरणाचे निर्दशनास आले आहे.

Scanned by CamScanner

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूकी संदर्भातील जिल्हा / तालुका / सहकारी निवडणूक अधिका-यांना निवडणूक नियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती प्रकटने व जाहिरात शासनमान्य दैनिक वर्तमानपत्रांनी शासकीय दराने प्रसिध्दी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी किंवा एकापेक्षा जास्त जिल्ह्यासाठी एक किंवा अनेक जाहिरात अभिकर्त्यांची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणाने संदर्भ क्र. १ वरील रासनिप्रा / अभिकर्ता नेमणूक / लेखा वि / कक्ष – १५ सन २०१६/५९६२ दि. १४.१०.२०१६ अन्वये राज्यस्तरीय वर्तमानपत्रामध्ये दि. १९.१०.२०१६ रोजी व्यापक प्रसिध्दी देवून इच्छूक अभिकर्त्याकडून आवेदनपत्रे मागविण्यांत आली होती. जिल्हा निहाय जाहिरात अभिकर्त्यांच्या नेमणूका करण्याचे, जेणेकरुन जाहिरातीवरील खर्च नियंत्रीत राहील व शासनाच्याच दराने जाहिरात प्रसिध्द होईल यासाठी अभिकर्ता नेमणूक करण्याचे प्राधिकरणाच्या विचाराधीन होते. सबब प्राधिकरण खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्राधिकरणास प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाप्रमाणे कलम ७३ कब व निवडणूक नियमातील नियम ३(V)(VI) व प्राधिकरणास समर्थ करणा-या अधिकाराचा वापर करुन सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रयोजनार्थ शासनमान्य दैनिक वर्तमानपत्रात शासन मान्य दराने जाहिरात / प्रकटने प्रसिध्द करण्यासाठी खालील नमुद जाहिरात अभिकर्ते ज्यांनी शासकिय दराने जाहिराती प्रसिध्द करणेसाठी संमती दिलेली आहे त्या जाहिरात अभिकर्त्यांची खालील अटी / शर्तींच्या आधारे खालील नमूद अभिकर्त्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

| अ.क्र. | जाहिरात अभिकर्त्यांचे नांवे | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ४ |
| १ | श्री. दिनेश यशवंत चंद्रस, नाशिक - मोरया मार्केटिंग , ११ विष्णू को.ऑप. हौसिंग सोसा. गायत्री नगर, हॉटेल सिधार्थ समोर, पुना रोड, नाशिक जि. नाशिक – ११. | नाशिक जिल्ह्यापूरते |
| २ | श्री. शहा रतिलाल भालचंद्र - साप्ताहिक भुवनरत्न, लाल मारुती मंदिराजवळ, मंडई पेठ, परंडा, जि. उस्मानाबाद - ४१३५०२ | सोलापूर , उस्मानाबाद जिल्ह्यापूरते |
| ३ | श्री. दादासाहेब सखाराम पोते - डीएसपी एंटरटेनमेंट प्रा.लि., ऑफीस क्र. ९, अमर पार्क अपार्टमेंटस, शिरोळे रोड, संभाजी उद्यान समोर, डेक्कन जि. पुणे -५. | पुणे जिल्ह्यापूरते |
| ४ | श्री.विवेक दिनकर जुगादे , मंगलम मास मिडीया, महाल, दक्षिणामूर्ती चौक, रुईकर रोड, महाल, जि. नागपूर. | नागपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया जिल्ह्यापूरते |
| ५ | श्री. संजयकुमार बाळासाहेब भोई, सीबीएस-कोल्हापूर – सीएएनव्ही -११९, ऑल इंडिया रेडिओ, जि. कोल्हापूर. | कोल्हापूर, सांगली जिल्ह्यापूरते |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. व्यंकटेश निशिकांत जोशी - माधवी मल्टी सर्व्हीसेस, एन ११, के टू /१ नवजिवन कॉलनी, सिडको, औरंगाबाद, जि. औरंगाबाद. | औरंगाबाद, पुणे, उस्मानाबाद, सोलापूर, नांदेड जिल्ह्यापूरते |
| ७ | श्री.नितीन निशिकांत जोशी - शेशाद्री टेलिकम्युनिकेशन अँड सर्व्हीसेस, एन ११, के टू /१ नवजिवन कॉलनी, हुडको औरंगाबाद, जि. औरंगाबाद. | औरंगाबाद, पुणे, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, सोलापूर जिल्ह्यापूरते |
| ८ | सौ. आसावरी नितीन जोशी - कर्मशियल सर्व्हीसेस , फ्लॅट नं.९, करणग्रीन अपार्टमेंट, वारजे, जि. पुणे. | औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, पुणे जिल्ह्यापूरते |
| ९ | श्री. औदुंबर दगडू ढावरे - संपादक साप्ताहिक सूर्यनारायण , मंगळवेढा, जि. सोलापूर. | सोलापूर जिल्ह्यापूरते |
| १० | श्री. शिला उंबरे - पेंडारकर, संपादक, लोकपत्रिका,<br>प्रथमेश ऑफसेट प्रिंटर्स, ए — १६, एम.आय.डी.सी. जि. उस्मानाबाद - ४१३५०१. | उस्मानाबाद,बीड,लातूर जिल्ह्यापूरते |
| ११ | श्रीमती जोशी प.द.<br>श्री. राजर्षि शाहू मिडीय कन्सलटंन्सी कोल्हापूर, बी — III -३, स्टेरलिंग टॉवर, गवत मंडई जवळ, जि. कोल्हापूर - | कोल्हापूर , सांगली, सातारा जिल्ह्यापूरते |
| १२ | श्री. श्रीकांत नारायण पाटील, अॅड मार्क कम्यंनिकेशन , मुंबई<br>३/६१, तळमजला, वाणी चाळ क्र. ३, पोतदार मील समोर, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई — ११. | मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यापूरते |
| १३ | श्री.ज्ञानदेव गुलाब माने,<br>संघवी अपार्टमेन्ट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,जी-१५, कमला नेहरु क्रॉस रोड नं.१, कांदिवली (प.) | मुंबई (मुंबई १,२,३ व ४) जिल्ह्यापूरते |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

अटी व शर्ती :-

१. जाहिरात अभिकर्त्यांना जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्राधिकरणाकडून कोणतेही मानधन, मोबदला, मेहनताना मिळणार नाही.

२. जाहिरात अभिकर्त्यांनी जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिका-यांशी संपर्कात राहून सहकारी संस्थांच्या निवडणूकी संदर्भातील जाहिर प्रकटने योग्य त्या आकारात प्राप्त करुन घेवून त्यांचे आदेशाप्रमाणे शहर, जिल्हा, विभागीय व राज्यस्तरावरील शासन मान्य दैनिक वर्तमानपत्रामध्ये शासन मान्य दराने जाहिरात प्रसिध्द करावी.

Scanned by CamScanner

३. जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर दैनिक वर्तमानपत्राकडून दोन प्रतीत देयक प्राप्त करुन घेवून ते जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिका-याकडे सादर करावे.

४. सहकारी संस्थेचा आकार, कार्यक्षेत्र इ. चा विचार करुन जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिका-याच्या आदेशाने शहर, तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावरील दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करावी.

५. सहकारी संस्थेच्या निवडणूकीच्या वेळापत्रकाप्रमाणे व मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे जाहिरात नियत वेळेपूर्वी प्रसिध्द करण्याची जबाबदारी जाहिरात अभिकर्त्याची राहील तसेच नियम वेळेत जाहिरात प्रसिध्द होईल याची खातरजमा संबंधित जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी व निवडणूक निर्णय अधिका-यावर राहिल.

६. जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आदेशात नमुद केलेल्या जाहिरात अभिकर्त्यामार्फतच अथवा थेट दैनिक वर्तमान पत्राकडे निवडणूक प्रयोजार्थच्या जाहिराती / प्रकटने प्रसिध्दीसाठी देणे बंधनकारक राहील. तथापी सदर जाहिरातीची देयके ही शासन मान्य दरानेच अदा करणे बंधनकारक राहील.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पुणे यांचे मान्यतेने.**

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रति,

१. विभागीय सह.निबंधक सहकारी संस्था तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
३. तालुका / उप / सहाय्यक / वार्ड निबंधक सहकारी संस्था तथा तालुका / वार्ड / सहाय्यक / उप निवडणूक अधिकारी
४. निवडणूक निर्णय अधिकारी
५. सर्व कक्ष अधिकारी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारण (सर्व)

Scanned by CamScanner

## जाहिरात अभिकर्त्याचे नांव, कार्यक्षेत्र, दूरध्वनी, मोबाईल क्र., ईमेल आयडी चा तपशिल

| अ.क्र. | जाहिरात अभिकर्त्याचे नांवे | कार्यक्षेत्र | दूरध्वनी / मोबाईल क्र. | ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. दिनेश यशवंत चंद्रस, नाशिक - मोरया मार्केटिंग , ११ विष्णू को.ऑप. हौसिंग सोसा. गायत्री नगर, हॉटेल सिधार्थ समोर, पुना रोड, नाशिक जि. नाशिक – ११. | नाशिक जिल्ह्यापूरते | ९८२२९५०७४९ | shubham.chandras5400@gmail.com |
| २ | श्री. शहा रतिलाल भालचंद्र - साप्ताहिक भुवनरत्न, लाल मारुती मंदिराजवळ, मंडई पेठ, परंडा, जि. उस्मानाबाद - ४१३५०२ | सोलापूर , उस्मानाबाद जिल्ह्यापूरते | ९४२१३६९७०१ / ९६२३४६४११८ | weeklybhuvanratna@gmail.com |
| ३ | श्री. दादासाहेब सखाराम पोते - डीएसपी एंटरटेनमेंट प्रा.लि., ऑफीस क्र. ९, अमर पार्क अपार्टमेंटस, शिरोळे रोड, संभाजी उद्यान समोर, डेक्कन जि. पुणे -५. | पुणे जिल्ह्यापूरते | ०२० - २५५१२४१५ / ६५२२००४१ / ७४१००२८११५ | dsplimited@outlook.com |
| ४ | श्री.विवेक दिनकर जुगादे , मंगलम मास मिडीया, महाल, दक्षिणामूर्ती चौक, रुईकर रोड, महाल, जि. नागपूर. | नागपूर, भंडारा, वर्धा, गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया जिल्ह्यापूरते | ९८२२९४४१९७ | vivek.jugade@gmail.com |
| [illegible] | श्री. संजयकुमार बाळासाहेब भोई, सीबीएस- कोल्हापूर – सीएएनव्ही -११९, ऑल इंडिया रेडिओ, जि. कोल्हापूर. | कोल्हापूर, सांगली जिल्ह्यापूरते | ९४०३१०५६५१ | Sanjaybhoi ६९६ @ gmail.com |
| ६ | श्री. व्यंकटेश निशिकांत जोशी - माधवी मल्टी सर्व्हीसेस, एन ११, के टू /१ नवजिवन कॉलनी, सिडको, औरंगाबाद, जि. औरंगाबाद. | औरंगाबाद, पुणे, उस्मानाबाद, सोलापूर, नांदेड जिल्ह्यापूरते | ९८२२९९२५०६ | nitsheshadri@rediffmail.com |
| ७ | श्री.नितीन निशिकांत जोशी - शेशाद्री टेलिकम्युनिकेशन अँड सर्व्हीसेस, एन ११, के टू /१ नवजिवन कॉलनी, हुडको औरंगाबाद, जि. औरंगाबाद. | औरंगाबाद, पुणे, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, सोलापूर जिल्ह्यापूरते | ७८४०९२८७४७ | nitsheshadri@rediffmail.com |
| ८ | सौ. आसावरी नितीन जोशी - कर्मशियल सर्व्हीसेस , फ्लॅट नं.९, करणग्रीन अपार्टमेंट, वारजे, जि. पुणे. | औरंगाबाद, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, पुणे जिल्ह्यापूरते | ९४२२२४०७५७ | nitsheshadri@rediffmail.com |
| ९ | श्री. औदुंबर दगडू ढावरे - संपादक साप्ताहिक सूर्यनारायण , मंगळवेढा, जि. सोलापूर. | सोलापूर जिल्ह्यापूरते | ९०४९८३५५९५ / ९८२२४५५[illegible] | suryanarayan weekly@gmail.com |
| १० | श्री. शिला उंबरे - पेंडारकर, संपादक, लोकपत्रिका, प्रथमेश ऑफसेट प्रिंटर्स, ए – १६, एम.आय.डी.सी. जि. उस्मानाबाद - ४१३५०१. | उस्मानाबाद,बीड,लातूर जिल्ह्यापूरते | ९८८१६३३१०६ | osmanabadsui@gmail.com |
| ११ | श्रीमती जोशी प.द. श्री. राजर्षि शाहू मिडीय कन्सलटंन्सी कोल्हापूर, बी – III -३, स्टेरलिंग टॉवर, गवत मंडई जवळ, जि. कोल्हापूर - | कोल्हापूर , सांगली, सातारा जिल्ह्यापूरते | ९४२२४१२५२५ | shahumedia@rediffmail.com |
| १२ | श्री. श्रीकांत नारायण पाटील, अँड मार्क कम्यूनिकेशन , मुंबई ३/६१, तळमजला, वाणी चाळ क्र. ३, पोतदार मील समोर, ना.म.जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई – ११. | मुंबई, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यापूरते | ९५९४१४०८२६ / ८८७९०७४५१० | admarkcommunicationg@gmail.com |
| १३ | श्री.ज्ञानदेव गुलाब माने, संघवी अपार्टमेन्ट को.ऑप.हौसिंग सोसायटी लि.,जी-१५, कमला नेहरु क्रॉस रोड नं.१, कांदिवली (प.) | मुंबई (मुंबई १,२,३ व ४) जिल्ह्यापूरते | ९७०२५७७५५० | atharvaraj.adv@gmail.com |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

Scanned by CamScanner